संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
विद्यार्थी विकास विभाग
दूरध्वनी : २६६०९४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३-विवि/**१०७**/२०२२
दिनांक : १७.०८.२०२२

प्रति,
**मा.प्राचार्य/विभागप्रमुख,**
सर्व संलग्नित महाविद्यालये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

**विषय :**

१. **१०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२२-२०२३ साठी अंमलबजावणी करणेबाबत..**
२. **विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द/स्थलांतरण (Cancellation of Admission/Migration of Students) यासंदर्भात शुल्क परत करण्यासंदर्भात तसेच कोविड-१९ महामारीच्या कालावधीत आकारण्यात आलेल्या खानावळ शुल्क (Mess Charges) व वसतिगृह शुल्काची (Hostel Fees) रक्कम पुढील शैक्षणिक वर्षामध्ये समायोजित करण्यासंदर्भात.**

संदर्भः

१. कार्यालय, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग यांचे पत्र क्र.ससं/उशि/शिष्य-२०२२-२३/सीएसएस/६१५४ दिनांक १२.०८.२०२२
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८ हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई यांचे पत्र क्र.युजीसी-२०२२/प्र.क्र.२०५/विशि-३ दिनांक ८ ऑगस्ट, २०२२

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सोबतचे परिपत्रक अवलोकावे व त्याअनुषंगाने आपण आपले स्तरावर कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(**डॉ.राजीव बोरकर**)
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

सहपत्र :

१. कार्यालय, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग यांचे पत्र क्र.ससं/उशि/शिष्य-२०२२-२३/सीएसएस/६१५४ दिनांक १२.०८.२०२२
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८ हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई यांचे पत्र क्र.युजीसी-२०२२/प्र.क्र.२०५/विशि-३ दिनांक ८ ऑगस्ट, २०२२

**प्रतिलिपी :**

०१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
०२. प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
०३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

# महाराष्ट्र शासन

## कार्यालय, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग,

## शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परिसर, अमरावती-४४४६०४

**Email**-jdheamt@yahoo.com दुरध्वनी क्रमांक - ०७२१-२५३१२३५

जा.क्र.ससं/उशि/शिष्य-२०२२-२३./सीएसएस/ 6954 दिनांक - १०/०८/२०२२ १२

प्रति,

१) कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

२) सर्व संचालक / प्राचार्य,
शासकीय/ अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण, विधी महाविद्यालये,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय** :- **<u>१०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२२-२३ साठी अंमलबजावणी करणे बाबत...</u>**

**संदर्भ** :- **<u>संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक उशिसं/शिष्य-२०२२-२३/सीएसएस/१००४७ दिनांक २७/०७/२०२२</u>**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित परिपत्रक अन्वये कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७** इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नवीन मंजूरीचे आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात** येत आहेत. ऑफलाईन (offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी

(Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर,२०२२ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थ्यी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन/ सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे.(उच्च शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक सोबत जोडण्यात येत आहे, सदर परिपत्रकाचे अवलोकन करावे.)

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२२-२३ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव/प्राचार्य/संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.

तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात. तसेच योजनेची माहीती सर्व विद्यार्थ्यांना मिळावी या करीता प्रयत्न करावेत, एकही पात्र लाभार्थी शिष्यवृत्तीपासून वंचीत राहणार नाही याबाबत आपल्या स्तरावरून प्रयत्न करावेत. योजनेची किमान पात्रता, अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे, नवीन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्य पध्दती, विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेसाठी सूचना व निकषांचा तपशील सोबत जोडला आहे.

**सहपत्रे** :- वरीलप्रमाणे.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक,(उच्च शिक्षण),
अमरावती विभाग, अमरावती

**प्रत** - माहितीस्त्व सविनय सादर,
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ /२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०२२-२३/सीएसएस/ १०५७ दि. २५.०७.२०२२

परिपत्रक 27 JUL 2022

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२२-२३ साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

उच्च माध्यमिक ( इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर,२०२२ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे.

❖ **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.
४. सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-**

- **नवीन मंजूरी / (Fresh)-**
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.
  २. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

- **नूतनीकरण (Renewal)-**

  १. मागील वर्षाची गुणपत्रिका.

❖ **नविन मंजुरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२२ ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक १५.११.२०२२ ही आहे.

३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) सदर योजनेसाठी SSC, CBSE व ICSE बोर्डचे टॉप २०$^{th}$ Percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फम केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची SSC बोर्डचे विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोकड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative/Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील.

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

११. एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

१२. एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

❖ **विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-**

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुण देण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२२-२३ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

तरी आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

( डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
१. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई ०१
३. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
४. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,**

**चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२**

Email ID :hted.vishi3-mh@gov.in


---

क्रमांक: युजीसी-२०२२/प्र.क्र.२०५/विशि-३ दिनांक:- ८ ऑगस्ट, २०२२.

प्रति,

मा. कुलगुरु,

सर्व अकृषी विद्यापीठे/सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे/सर्व अभिमत विद्यापीठे

विषयः- विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द /स्थलांतरण (Cancellation of Admission/ Migration of Students) यासंदर्भात शुल्क परत करण्यासंदर्भात तसेच कोविड-१९ महामारीच्या कालावधीत आकारण्यात आलेल्या खानावळ शुल्क (Mess Charges) व वसतिगृह शुल्काची (Hostel Fees) रक्कम पुढील शैक्षणिक वर्षामध्ये समायोजित करण्यासंदर्भात.

संदर्भः- (१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(९३/२२)/विशि-१/१०४४१, दि. ०४/०८/२०२२ व त्यासोबतचे सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्र.२-७१/२०२२ (CPP-II), दि.०२/०८/२०२२

(२) सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्र.२-६०/२०२२ (CPP-II), दि.०२/०८/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भाधीन क्र. (१) येथील पत्रान्वये सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षासाठी विशेष बाब म्हणून उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द /स्थलांतरण (Cancellation of Admission/Migration of Students) यासंदर्भात शुल्क परत करण्यासंदर्भात तसेच संदर्भाधीन क्र. (२) येथील पत्रान्वये सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी कोविड-१९ महामारीच्या कालावधीत आकारण्यात आलेल्या खानावळ शुल्क (Mess Charges) व वसतिगृह शुल्काची (Hostel Fees) रक्कम पुढील शैक्षणिक वर्षामध्ये समायोजित करण्याबाबत सर्व विद्यापीठांच्या कुलगुरु तसेच सर्व महाविद्यालये/संस्थांच्या प्राचार्य/संचालक यांना निर्देश दिले आहेत. तरी, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन दोन्ही पत्रांतील निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याकरिता सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

आपला,

सहपत्रः- वरीलप्रमाणे

(अ.म.बाविस्कर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

(२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(३) संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(४) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे/ सर्व अभिमत विद्यापीठे

(५) निवडनस्ती (विशि-३).

Gcc/935/UC3
8/8/2022


महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९


क्रमांक : युएनआय/( ९३/२२)/विशि-१ / ९०४४७ दि. - 4 AUG 2022

प्रति,

मा.प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.

**विषय** **Fee Refund Policy 2022-2023**

संदर्भ विद्यापीठ अनुदान आयोगाचे अर्धशासकीय पत्र क्रमांक 2-71/2022(CPP-II) दि.२ ऑगस्ट, २०२२

उपरोक्त विषयाबाबतचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे दि.०२ ऑगस्ट, २०२२ चे सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना तसेच प्राचार्य/संचालक सर्व महाविद्यालये/संस्था यांना पाठविलेले अर्धशासकीय पत्र सोबत जोडले आहे, कृपया अवलोकनी घ्यावे.

वरील संदर्भिय पत्रानुसार सादर करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षासाठी विशेष बाब म्हणून उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द/स्थलांतरण (Cancellation of Admission/Migration of Students) बाबतीतील फी परत करणेसंदर्भात सदरचे अर्धशासकीय पत्र जारी केलेले आहे.

सदर पत्रामध्ये दि.३१ ऑक्टो, २०२२ पर्यत प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द/स्थलांतरण (Cancellation of Admission/Migration of Students) केल्यास संपुर्ण फी परत करणेबाबत तसेच दि.३१ डिसेंबर,२०२२ पर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द/स्थलांतरण (Cancellation of

Admission/Migration of Students) केल्यास रुपये १०००/- प्रक्रिया शुल्क वजा जाता उर्वरित सर्व फी विद्यार्थ्यांस परत करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

यासंदर्भात शासन स्तरावरुन सर्व विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांना उचित कार्यवाही करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात यावेत अशी शासनास विनंती करण्यात येत आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

314

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. रजनीश जैन
सचिव

**Prof. Rajnish Jain**
Secretary

सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
शिक्षा मंत्रालय, भारत सरकार
(Ministry of Education, Govt. of India)
बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
Ph.: 011-23236288/23239337
Fax : 011-2323 8858
E-mail : secy.ugc@nic.in

**D.O.No.2-71/2022(CPP-II)** **2nd August, 2022**

**Subject: Fee refund policy 2022-2023**

Respected Madam/Sir,

As you are aware that the University Grants Commission has issued 'the UGC guidelines on examination and academic calendar in view of the Covid-19 pandemic' on 16th July, 2021, wherein UGC has stipulated the provision of refund of fees on account of all cancellations of admissions/ migrations of students during the academic session 2021-2022. Also, UGC on 12th July, 2022 has requested the higher educational institutions to fix the last date of their under graduate admission process after declaration of result of class XII by CBSE so as to provide sufficient time to such students for admission in under graduate courses. Also, it may be noted that several entrance examinations including CUET, JEE Main, JEE Advance etc. have been delayed, due to which admissions may continue up to October, 2022.

In view above, and in order to avoid financial hardships being faced by parents, it has been decided by UGC that full refund of fees should be made by the higher educational institutions on account of all cancellations of admissions/ migrations of students up to October 31, 2022 for the academic session 2022- 2023 as a special case. It is made clear that the entire fee, including all charges, should be refunded (i.e., there should be zero cancellation charges) on account of cancellations/ migrations up to October 31, 2022. Thereafter, on cancellation/ withdrawal of admissions up to December 31, 2022, the entire fee collected from a student should be refunded in full after deducting not more than Rs.1000/- as processing fee.

All the Higher Educational Institutions are requested to ensure the compliance of the UGC directions in respect of refund of fee in view of COVID-19 Pandemic related factors.

With kind regards,

Yours sincerely,

**(Rajnish Jain)**

To,

**The Vice-Chancellors of all universities**
**The Principals/Directors of all colleges / institutes**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. रजनीश जैन
सचिव

Prof. Rajnish Jain
Secretary

सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
(शिक्षा मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Education, Govt. of India)
बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
Ph.: 011-23236288/23239337
Fax : 011-2323 8858
E-mail : secy.ugc@nic.in

**D.O.No.2-60/2022 (CPP-II)** **August, 2022**

02 AUG 2022

Respected Madam/Sir,

As you are aware that UGC has issued guidelines on Academic Calendar and Examination in view of COVID-19 Pandemic. A letter dated 27.05.2020 and 17.12.2020 was also issued to HEIs requesting them to ensure compliance in respect of refund of fee. Inspite of this, several references have been received from students stating that they did not use the hostel and mess services during the COVID-19 Pandemic period yet the institutions are not adjusting/refunding the mess charges and hostel fees, already paid by them.

All the higher educational institutions are requested to adjust/carry forward the mess charges and hostel fees to all students charged during the COVID-19 Pandemic period. You are requested to comply with the instructions in letter and spirit.

With kind regards,

Yours sincerely,

**(Rajnish Jain)**

**To**
**The Vice-Chancellors of all Universities**
**The Principals of all Colleges/Institutes**